CR1967092222

नंबर कॉन/ एस्‌. आर्‌. -१२९
पुणें, दिनांक २२-९-६७.

परिपत्रक. .

एकत्रीकरण अधिकारी (सर्व)

विषय - जमीन एकत्रीकरण योजना
लहान खातेदारांचे हितसंबंध संरक्षण करण्याबाबत..

१६ व्या अंदाज समितीच्या (१९६५-६६) अहवालात एका तक्रारीचा उल्लेख करुन असे नमूद करण्यांत आले आहे कीं, एकत्रीकरण योजना आखताना आर्थिकदृष्ट्या सुस्थितीत असलेले जमिनींचे खातेदार/कुळ ~~(मालक)~~ हे लगतच्या लहान खातेदारावर/कुळावर गैररितीनें दबाव आणून एकत्रीकरण योजनेत केवळ स्वतःचाच फायदा होईल अशा प्रयत्नात असतात. याासाठी समितीने असे सुचविले आहे कीं, एकत्रीकरणाच्या योजना आखताना लहान खातेदाराचे/कुळांचे हितसंबंध सुरक्षित रहाण्यासाठी विशेष काळजी घ्यावी व मोठ्या खातेदाराकडून कोणत्याही प्रकारे दबाव आणून लहान खातेदाराना अगर कुळांना आपली जमीन सोडण्यास भाग पाडू नये अथवा त्यांचे नें नुकसान होईल असे बदल करू नयेत.

२. एकत्रीकरण योजना तयार करण्याच्या हल्लीच्या पध्दतीमुळे व वेळो वेळी दिलेल्या सुचना प्रमाणें कितीही लहान खातेदार असला तरी तो भूमीहीन करू नये असे आहे. तथापि वर नमूद केलेले तक्रारीचे संदर्भात सर्व एकत्रीकरण अधिकारी व सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांनी याबाबत विशेष लक्ष घालण्याची आवश्यकता असल्यामुळें त्यांना असा आदेश देण्यात येत आहे कीं, योजना आखतांना व तिच्या वेगवेगळ्या टप्प्यांची तपासणी करताना अशा लहान खातेदारांची गट बांधणी विशेष काळजीपूर्वक तपासून पहावी. व अशा त-हेचा लहान खातेदारावर कोठे अन्याय झाला आहे असे आढळून आल्यास त्याचे निराकरण जागच्या जागी करावे.

स. गो. भिरडे [signature]
जमाबंदी आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, पुणें

प्रत - सचिव, महसूल व वन विभाग मुंबई यांना त्यांच्याकडील ज्ञापन क्रमांक एस्‌. १४/६८५०२ -ब, दिनांक ८ ऑगष्ट १९६७ यास अनुसरून सादर अग्रेषित.

प्रत - कार्यालयातील संकलन परिनिरीक्षण कारकून (सर्व) भूमि अभिलेख (एकत्रीकरण) यांच्याकडे माहितीसाठी रवाना.

कु. २०-९.